**ठळक बातम्या**

- मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना जाहीर
- येत्या तीन वर्षांत केंद्र सरकार देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात डे केअर कॅन्सर सेंटर उभारणार
- प्रार्थनास्थळावरचे भोंगे रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत बंद ठेवावे लागणार, मर्यादित कालावधीसाठीच परवानगी देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
- बलुचिस्तानमध्ये दहशतवाद्यांकडून रेल्वेवर हल्ला, सैन्याचे ६ कर्मचारी ठार १०० प्रवासी ओलीस

**आणि**

- क्रीडा मंत्रालयानं भारतीय कुस्ती महासंघावरचं निलंबन उठवलं

**<><><><><>**

मॉरिशसच्या दौऱ्यावर असलेल्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आज मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर झाला. द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ इंडियन ओशन असं या सन्मानाचं नाव आहे. प्रधानमंत्री मोदी यांना मिळालेला हा २१वा सर्वोच्च नागरी सन्मान आहे.

भारतात पश्चिम भागात येणारी काही साखर मॉरिशसहून आयात होत होती. काळाच्या या टप्प्यावर भारत-मॉरिशस संबंधांची गोडी अजूनच वाढली असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. याच कार्यक्रमात मोदी यांनी मॉरिशसचे प्रधानमंत्री नवीन रामगुलाम आणि त्यांच्या पत्नी वीणा यांना ओव्हरसीज सिटीझन ऑफ इंडिया कार्ड जारी करत असल्याची घोषणा

केली. त्याखेरीज मॉरिशसचे राष्ट्रपती धरमबीर गोखूल आणि त्यांच्या पत्नी वृंदा यांनाही ओसीआय कार्ड जारी केलं.

तत्पूर्वी आज त्यांनी पॅम्पलेमॉसेस इथे मॉरिशसचे माजी राष्ट्रपती सर अनिरुद्ध जगन्नाथ आणि प्रधानमंत्री सिवुसागुर रामगुलाम यांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

येत्या तीन वर्षांत देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात डे केअर कॅन्सर सेंटर उघडण्यात येतील, अशी माहिती आज राज्यसभेत केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. पुढच्या आर्थिक वर्षात दोनशे डे केअर कॅन्सर सेंटर उघडली जातील, असंही नड्डा म्हणाले.

देशात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत जिथं निर्देश आणि नियमांचं उल्लंघन होईल, तिथं पथकं पाठवून योग्य ती कारवाई केली जाईल, असं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

**<><><><><>**

गेल्या ११ वर्षात प्रत्येक अर्थसंकल्पात शैक्षणिक क्षेत्रासाठी केलेली तरतूद वाढवत नेल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेन्द्र प्रधान यांनी म्हटलं आहे. शिक्षण मंत्रालयाच्या संदर्भातल्या चर्चेला उत्तर देताना ते आज राज्यसभेत बोलत होते. शिक्षणक्षेत्राप्रती सरकारची वचनबद्धता यावरून सिद्ध होते असं ते म्हणाले. शिक्षणमंत्रालयासोबत महिला आणि बालकल्याण मंत्रालय तसंच

आरोग्य मंत्रालयांच्या संयुक्त प्रयत्नांमधून सर्वंकष बालशिक्षण, पोषण आणि विकास साधला जात असल्याचं ते म्हणाले.

याआधी काँग्रेस खासदार दिग्विजय सिंग यांनी शिक्षक प्रशिक्षण आणि विद्यार्थी संशोधकांना जुनियर रिसर्च फेलोशिप मिळण्यात होत असलेल्या विलंबाचा मुद्दा उपस्थित केला होता. सरकार विद्यापीठांकडून वस्तू आणि सेवा कर घेत असल्याचं त्यांनी निदर्शनाला आणलं.

देशभरातल्या साडेचौदा हजार शाळांचं आधुनिकीकरण सुरु असून समग्र शिक्षण अभियानासाठी सरकारने ४१ हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याचं भाजप खासदार घनश्याम तिवारी यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

प्रार्थनास्थळांवर भोंगे लावण्यासाठी कुणालाही सरसकट परवानगी देणार नाही. मर्यादित कालावधीसाठी ही परवानगी दिली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत केली. पुन्हा परवानगी हवी असल्यास पुन्हा अर्ज करावा लागेल. हे भोंगे रात्री १० वाजल्यापासून सकाळी ६ वाजेपर्यंत बंद असले पाहिजेत. याच्या अंमलबजावणीची जबाबदारी स्थानिक पोलीस निरीक्षकाची असेल, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**होल्ड - मुख्यमंत्री... (२० सेकंद)**

पुणे जिल्ह्यातील स्वारगेट येथील एस टी बस आगारात एका तरुणीवर बलात्काराची घटना घडल्यानंतर तिथल्या आगार व्यवस्थापकासह चार जणांची चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात आलं आहे. या आगारातल्या २२ सुरक्षा रक्षकांची अन्यत्र बदली करण्यात आली असल्याची

माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत एका निवेदनाद्वारे दिली.

<><><><><>

खादी कारागिरांचं वेतन येत्या १ एप्रिलपासून २० टक्क्यांनी वाढवण्याची घोषणा खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष मनोज कुमार यांनी केली आहे . ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. गेल्या ११ वर्षांमध्ये सरकारने खादी कारागिरांचं वेतन २७५ टक्क्यांनी वाढवलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्याविषयी जागरूकता वाढविण्यासाठी कृषी आणि पर्यावरण तज्ज्ञांशी सल्लामसलत करून संशोधन करण्याचं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी डॉक्टरांना केलं. त्या पंजाबमधे बठिंडा इथं अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या पहिल्या दीक्षांत समारंभाला त्या संबोधित करत होत्या. अंमली पदार्थांच्या व्यसनामुळे होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक हानीबाबत लोकांना जागरूक केलं पाहिजे असं त्यांनी सांगितलं. आध्यात्मिक आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्यानं निरोगी जीवनशैलीबाबत जनजागृती मोहीम राबवण्याचा सल्ला त्यांनी दिला.

<><><><><>

येत्या २ वर्षात ईशान्येकडच्या सर्व राज्यांच्या राजधान्या रेल्वे, हवाई आणि रस्ते मार्गाने जोडल्या जातील, असं आश्वासन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिलं आहे. नवी दिल्लीत स्टुडंट एक्सपिरीयन्स इन इंटर-स्टेट लिव्हिंगने आयोजित केलेल्या परिषदेत ते बोलत होते. ब्रह्मपुत्रा नदीवर

भारतातला सर्वात मोठा रेल्वे-रस्ते उड्डाणपूल बांधण्यात येत असल्याचंही शहा यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

देशातली निवडणूक प्रक्रीया मजबूत करण्याच्या दृष्टीनं केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांकडून सूचना मागवल्या आहेत. मतदार याद्यांमधे घोळ असल्याचे आरोप विरोधी पक्षांकडून होत असल्याच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने हा पुढाकार घेतला आहे. निवडणूक प्रक्रीयेत काही अडचणी असल्यास येत्या ३० एप्रिलपर्यंत कळवाव्या असं पत्र मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सर्व राजकीय पक्षांना लिहीलं आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानात बलुचिस्तानमध्ये सशस्त्र दहशतवाद्यांनी पेशावर-क्वेट्टा जाफर एक्सप्रेसवर हल्ला केला आहे. त्यात पाकिस्तानी सैन्याचे ६ कर्मचारी ठार झाले आहेत. दहशतवाद्यांनी 100 हून अधिक प्रवाशांना ताब्यात घेतल्याचं वृत्त आहे. या रेल्वेत साडे चारशेहून अधिक होते. या रेल्वेगाडीवर दहशतवाद्यांनी गोळीबार केल्यामुळे ती रुळावरून घसरल्याची माहिती बलुचिस्तान प्रांताचे सरकारचे प्रवक्ते शाहिद रिंद यांनी दिली आहे. या हल्ल्याची जबाबदारी बलुचिस्तान लिबरेशन आर्मी या दहशतवादी गटाने स्वीकारली असून पाकिस्तानी सैन्याने हस्तक्षेप करू नये असा इशाराही दिला आहे.

**<><><><><>**

दक्षिण आफ्रिकेत जोहान्सबर्ग इथं महामार्गावर पहाटे बस उलटून झालेल्या अपघातात १२ जणांचा मृत्यू झाला, तर ४५ जण जखमी झाले आहेत. बळींची संख्या वाढण्याची शक्यता आपत्कालीन व्यवस्थापनानं व्यक्त केली आहे.

<><><><><>

क्रीडा मंत्रालयानं भारतीय कुस्ती महासंघावरचं निलंबन उठवलं आहे आणि मार्गदर्शक तत्त्वं निश्चित केली आहेत. या निर्णयामुळे जॉर्डनमधे अम्मान इथं होणाऱ्या आगामी आशियाई अजिंक्यपद स्पर्धेसाठी खेळाडूंच्या निवड चाचणीसह इतर उपक्रम पुन्हा सुरू करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. मंत्रालयानं सर्व आंतरराष्ट्रीय स्पर्धांची निवड नि: पक्षपातीपणे, पारदर्शकपणे आणि क्रीडा संहिता, कुस्ती नियम आणि इतर अधिकृत निर्देशांचे पालन करून करण्याचं तसचं महासंघाला आपल्या निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये सत्तेत समतोल राखण्याच्या आणि निलंबित किंवा बडतर्फ अधिकाऱ्यांपासून दूर राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

यानंतर बंदीला आव्हान देणारी महासंघाची याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने निकालात काढली आहे. दरम्यान, महासंघाच्या नेमणुकीविषयी तक्रार असल्यास तक्रारदार खेळाडूंना या निर्णयाविरोधात न्यायालयात दाद मागता येईल, असं मुख्य न्यायधीश देवेंद्र उपाध्याय आणि न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांनी सांगितलं.

<><><><><>

फिलिपिन्सचे माजी अध्यक्ष रॉड्रिगो दुटर्टे यांना आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाच्या वॉरंट अंतर्गत आज मनिला विमानतळावर अटक करण्यात

आली. दक्षिण फिलिपिन्समधल्या दावाओ शहराचे महापौर आणि नंतर राष्ट्राध्यक्ष असताना त्यांच्या आदेशावरून झालेल्या नरसंहाराच्या गुन्ह्यासाठी त्यांच्यावर हे वॉरंट बजावण्यात आलं आहे.

**<><><><><>**

वुमन्स प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांचा सामना सुरु आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम **क्षेत्ररक्षण** करायचा निर्णय घेतला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा बेंगळुरूनं ९ षटकात १ बाद ८१ धावा केल्या होत्या.

**//<><><><><>//**